गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# शरद पवार मोठे नेते,विचार करूनच शिंदेंचा सत्कार केला:संजय राऊतांच्या आरोपावर उदय सामंतांचे उत्तर

## संजय राऊतांची खरी पोटशूळ कोणती? ; हीच पोटशूळ असल्याची टीका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

एखाद्या संस्थेने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला. त्या संस्थेला एकनाथ शिंदे यांचा नेतृत्व, कर्तृत्व योग्य वाटले आहे. त्यांनी घेतलेले निर्णय योग्य वाटले. त्यांनी दिल्लीमध्येच एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्या मागेही काहीतरी कारण असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे. शरद पवार हे मोठे नेते आहेत. विचार करुनच त्यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला असल्याचा दावा उदय सामंत यांनी केला आहे. या माध्यमातून सामंत यांनी संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे.एकनाथ शिंदे यांचा सत्कार दिल्लीतच का केला, हे देखील समजून घ्यायला हवे, असे म्हणत मंत्री उदय सामंत यांनी संजय राऊत यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. वास्तविक एकनाथ शिंदे यांचा सत्कार झाला, हीच त्यांची खरी पोटदुखी आणि पोटशूळ असल्याचा आरोप उदय सामंत यांनी केला आहे.

साहित्य संमेलन आले की, अशा पद्धतीने वाद होतच असतात. मात्र साहित्यिकांनी कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण केला नाही, हेच या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले आहे. अतिशय उत्कृष्ट समन्वय साधून देशाच्या राजधानी मध्ये साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहेत. मात्र कोणीतरी वाद घालणारा पाहिजे, त्याच्या शिवाय साहित्य संमेलन गाजणार कसे? असा प्रश्न सामंत यांनी व्यक्त केला. साहित्य संमेलनामध्ये राजकारणातून वाद घालण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप देखील उदय सामंत यांनी केला आहे.

सचिन प्रधान किंवा धर्मवीर आनंद दिघे यांचा कायमच एकनाथ शिंदे यांनी सन्मान केला आहे. मी देशाच्या नेत्याला कसे वागावे हे सांगायला लागलो, तर लोक त्या नेत्याची किंमत करणार नाही तर माझी किंमत करतील. शरद पवार हे गेली ५६ वर्ष महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणात आहेत. त्यांना चांगले काय वाईट काय? हे माहिती आहे. ते महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेले आहेत. देशाचे संरक्षण, अन्न, कृषी मंत्री राहिलेले आहेत. त्यामुळे अशा व्यक्तीने विचार करूनच एकनाथ शिंदे यांचा सत्कार केलेला असेल. त्यामुळे यामध्ये कोणी कोणाचा सत्कार केला किंवा कोणत्या संस्थेने केला यापेक्षा एकनाथ शिंदे यांचा सत्कार झाला, हेच आरोप करण्यामागचे मूळ आहे. हीच संजय राऊतांची खरी पोटशूळ असल्याचा आरोप मंत्री उद्या सामंत यांनी केला आहे.



# इलेक्ट्रॉनिक फ्रीज मुळे माठाला गेला तडा;गरिबांच्या फ्रीजला उतरती कळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

उन्हाळ्याची चाहूल लागताच नागरिकांचा ओढा थंड सावली,पाणी याकडे वाढताना दिसतो. उन्हाच्या तिव्रतेमुळे शारीरिक धग आणि सुकलेला कंठ ओला करण्यासाठी हल्ली तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रॉनिक फ्रीज सारख्या उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे हातानी घडवण्यात आलेल्या मातीच्या माठास मात्र उतरती कळा लागली असल्याचे दिसून येत आहे. तर ग्रामीण भागातील कुंभार जमातीवर उपासमारीची वेळ आली असल्याचे चित्र दिसून येत आहे.यामुळे माठाला गेला तडा असं म्हणण्याची वेळ आता कुंभार बांधवावर आली आहे.

शिराढोण गावची लोकसंख्या साधारणतः पंधरा हजाराच्या आसपास आहे.गावात जवळपासच्या खेड्यातून काही प्रमाणात बाजार केंद्र म्हणून नेहमीच रेलचेल चालू असते.असं असलं तरी यंदाच्या वर्षी माठ विकत घेण्यासाठी लोकांची संख्या रोडावली असल्याचं गावातील कुंभार बांधव सांगत होते.ग्रामीण भागात अर्थार्जनासाठी सालाबादाप्रमाणे वडिलोपार्जित व्यवसाय म्हणून मातीपासून सुबक असे रांजण, कोंडले,येळणी, सुरई,छोट्या मोठ्या आकाराचे माठ यासम अनेक वस्तू कुंभार बांधव बनवत आहेत.परंतु याकडे खरेदीसाठी ग्राहकाचा ओघ कमी होत असल्याचे चित्र आहे.उन्हाळ्यात



नागरिकांची तहानतृप्ती भागवत शारीरिक थंडावा देणाऱ्या कुंभार बांधवांना जीवनात मात्र मागील काही वर्षांपासून कायम आर्थिक चटके सोसावे लागत असल्याच बोलल जात आहे.सद्यस्थितीस घरोघरी थंड पाण्यासाठी तंत्रज्ञानाच्या या युगात माठास पर्यायी इलेक्ट्रॉनिक फ्रीझचा वापर वाढला त्यामुळे श्रमातून कष्टाने तयार केलेली मातीची भांडी वापरणे दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.आयुर्वेदात मातीपासून बनलेल्या भांड्यास अनन्य साधारण महत्व आहे.पण सद्यस्थितीस केवळ लग्नसराइतच रांजनाची विक्री होते परंतु एरवी आमच्याकडे कुणीही येत नाही असे बालाजी टिमकेकर आणि त्यांच्या पत्नी सांगत होत्या.केवळ या पारंपरिक व्यवसायावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असल्यामुळे कुंभार बांधवावर आता आर्थिक संकट ओढावत आहे .

# नायगाव येथे संत रविदास महाराज यांना अभिवादन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

विज्ञानवादी थोर संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त नायगाव शहरातील संत रविदास नगर येथे समाज बांधव व अन्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले आहे.श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती औचित्य साधून सर्व समाज बांधवांनाच्या वतीने श्री संत गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना त्रिवार वंदन करण्यात आले असून यावेळी सर्व समाज बांधवांना जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा कांबळे राजेंद्र राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हाध्यक्ष नांदेड यांनी दिले.नायगाव येथील चर्मकार समाज बांधव उपस्थित होते व ईतर संघटनेच्या माध्यमातून सर्वांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# रक्तपेढीसाठी सरकारकडे पाठपुरावा करू खा.रवींद्र चव्हाण यांचे आश्वासन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नरसी । सय्यद चॉदपाशा नरसीकर**

शहरांतील हजरत सय्यद शहा जियाउद्दीन रफाई, अलहाज हजरत मौलाना सय्यद अनिसुरहेमान सहब, खैसर देशमुख, काझी हामेदआली तनविरसाहब, सय्यद निसार, कारी अखील उर रहेमान साहेब यांच्या स्मरणार्थ रविवारी दि. ९ फेब्रुवारी रोजी बंगलेवाली मस्जिद समोरील अप्सरा मैदान, जिया चौक येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यात जवळपास ३७१ जणांनी स्वयंस्फूर्तीन रक्तदान केले.



रविवारी सकाळी ८ वाजता रक्तदान शिबिराला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक नरेश देवणीकर, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेठवार, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पद्मवार यांची उपस्थिती होती. रक्तपेढीची मागणी सहा वर्षांपासून शिबिराच्या माध्यमातून शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करून रुग्णसेवा केली. पण देगलूर शहराची वाढती लोकसंख्या पाहता हा प्रयत्न कमी पडत आहे. त्यामुळे देगलूर शहरात रक्तपेढीची अत्यंत आवश्यकता असल्याचे आयोजकांच्या वतीने एमआयएमचे मोहम्मद जाकीर यांनी खा. रवींद्र चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर खासदार रवींद्र चव्हाण यांनी सदरील रक्तपेढीसाठी त्वरित आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे पाठपुरावा करू, असे सांगितले.दिवसभर चाललेल्या या महारक्तदान शिबिरात ३७१ युवकांनी रक्तदान केले, अशी माहिती आयोजक मुफ्तीयान ए कीराम, उलेमा एक कीराम, हुफ्फाजे एक ईजाम, अय्यमा ए मसाजिद व मुसलमानाने देगलूरच्या वतीने देण्यात आली.

# रुग्ण कल्याण समितीच्या सदस्य पदी अनिल वाघमारे व गजानन भारती यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । राजकिरण देशमूख**

माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात रुग्ण कल्याण समितीच्या नियमक मंडळाच्या सदस्य पदी अनिल वाघमारे तर कार्यकारी मंडळ समितीच्या सदस्य पदी माहूरचे पत्रकार गजानन भारती यांची निवड करण्याचे पत्र आमदार भीमराव केराम यांनी दिल्याने जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली माहूरच्या ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक के बी वाघमारे यांनी रुग्ण कल्याण समितीची बैठक दि १२ रोजी बोलावून आमदार पुरस्कृत प्रतिनिधी अनिल वाघमारे आणि गजानन भारती यांचा हृदय सत्कार केला किनवट माहूरचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांनी दिनांक २८ /१/ २०२५ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक यांना तातडीचे पत्र देऊन भाजपाचे ओबीसी सेलचे प्रदेश सचिव तसेच रुग्ण कल्याण समितीमध्ये कार्यरत राहून हजारो रुग्णांना



दिवस–रात्र सेवा देणारे अनिल वाघमारे यांचे सह धडाडीचे पत्रकार गजानन भारती यांची तात्काळ निवड करावी असे पत्र दिले त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या आदेशाने माहूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक के बी वाघमारे यांनी वरील दोन्ही मान्यवरांना पत्राद्वारे कळवून बैठकीस बोलावत त्यांचा हृदय सत्कार केला यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ विपिन बाबळे यांचे सह सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी परिचारिका अधिपरिचारिका उपस्थित होत्या.रुग्ण कल्याण च्या सदस्य पदी अनिल वाघमारे आणि गजानन भारती यांची निवड झाल्याने पुढील कार्यकाळात त्यांच्या हातून ग्रामीण रुग्णालयात सुविधा वाढाव्यात आणि रुग्णांची सेवा व्हावी यासाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ तसेच भाजपच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्याकडून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत

# औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव शरदचंद्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल व्हिजिट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

नवीन शैक्षणिक धोरण –२०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देण्याच्या अनुषंगाने शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. ही भेट कुंटूरकर शुगर व ग्रो प्रायव्हेट लिमिटेड येथे घेण्यात आली. या उपक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ. के. हरिबाबू यांनी केले, तर डॉ. एस. एस. पाटील (उपप्राचार्य) आणि डॉ. एस. एस. अंजनिकर यांनी नियोजन केले.

ही भेट विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साखर कारखान्याची कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरली. या वेळी प्रा. एम. एच. पांगरकर, डॉ. प्रशांत तावडे आणि प्रा. ए. एल. जक्कावाड उपस्थित होते. कारखान्याचे चेअरमन माननीय श्री. राजेश कुंटुरकर यांनी या भेटीसाठी विशेष परवानगी दिली. तसेच जनरल मॅनेजर श्री.काले साहेब आणि क्षेत्रीय अधिकारी श्री. सतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.पतंगे साहेब व श्री. कदम साहेब यांनी विद्यार्थ्यांना साखर उत्पादनाच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती दिली.

विद्यार्थ्यांना कारखान्यातील तंत्रज्ञान, साखरनिर्मिती प्रक्रिया, ऊस गाळप प्रणाली याविषयी सखोल माहिती मिळाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना ऊस रसाचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले असून, प्रत्यक्ष अनुभवातून त्यांना उद्योग क्षेत्रातील प्रक्रिया समजावून घेण्याची संधी मिळाली.विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौऱ्याचा मनमुराद आनंद घेतला असून अशा उपक्रमांमुळे उद्योग व शिक्षण यामधील दुवा अधिक बळकट होतो, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के हरीबाबू यांनी व्यक्त केले.



# वाघोलीतील आठवडे बाजारात नियोजनाचा अभाव; मोबाईल चोरांचा सुळसुळाट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**



झपाट्याने नागरिकीकरण वाढत असलेल्या वाघोली येथील आठवडे बाजारात नियोजनाचा अभाव दिसून येत आहे. वर्दळीच्या रस्त्यावरच विक्रीसाठी बसणारे पथारीवाले, फळे-भाजीपाला विक्रेते, रस्त्याच्या मधोमध उभ्या केल्या जाणाऱ्या हातगाड्या, टेम्पो, दुचाकी-चारचाकी यांची अवैध पार्किंग, अस्ताव्यस्त उभ्या केल्या जाणाऱ्या रिक्षा यामुळे तासन तास वाहतूक कोंडी होत आहे.तसेच वाहतूक पोलिसांचेही याकडे दुर्लक्ष होताना दिसत असून याचा फटका ग्राहकांना आणि सामान्य नागरिकांना बसत आहे.वाघोली येथे मंगळवारी नियोजित बाजारचा दिवस आणि रविवारी नागरिकांना सुट्टी असल्याने आठवडे बाजार भरत असतो. सकाळी नऊ ते सायंकाळी उशिरापर्यंत हा बाजार असतो. बाजारांमध्ये भाजीपाला, फळे, मसाला, कपडेवाले, स्टेशनरी साहित्य, भांडी अशी अनेक वस्तूंची शेकडो दुकाने असतात. तसेच पंचक्रोशीतील नागरिक खरेदीसाठी इथे येत असल्याने बाजारात येणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठी असते.

अशात पुणे - नगर महामार्ग, तसेच आव्हाळवाडी, हडपसर कडे हा वाहनांच्या वाहतुकीसाठीचा मुख्य वर्दळीचा रस्ता असून देखील येथेच भाजी विक्रेते व इतर साहित्य विक्रेते पथारीवाल्यांनी रस्त्यांच्या दुतर्फा अतिक्रमणे केलेली असतात . त्यामुळे मुळात अरुंद असलेला हा रस्ता आणखीन अरुंद झाला आहे.या मुख्य रस्त्यावरच पथारीवाले, हातगाडी विक्रेते उभे राहत असल्याने ग्राहकांना त्यांची वाहने रस्त्यावर पार्किंग करावी लागत आहेत. सायंकाळी ग्राहकांची संख्या वाढल्यानंतर या परिस्थितीत गर्दी वाढून वाहतूक कोंडी होते. यामुळे खरेदीसाठी आलेले ग्राहक वाहतूक कोंडीत अडकून पडतात.वाहतूक नियंत्रण पोलीस, स्थानिक पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका प्रशासन यांचे आठवडे बाजारातील या परिस्थितीकडे दूर्लक्ष होत असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. आठवडे बाजार कोणत्या दिवशी असावा इथपासून ते कोणत्या विक्रेत्यांना दुकानांची मुभा द्यावी, जागेची मर्यादा, वाहतूक नियोजन, बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई, बेशिस्त विक्रेत्यांवर कारवाई, शौचालय पथदिवे इत्यादी भौतिक सुविधांचा अभाव असे अनेक प्रश्न याबाबत प्रलंबित असल्याचे सुज्ञ नागरिक सांगत आहेत.

### पाकिटमार, मोबाईल चोर यांचा बंदोबस्त व्हावा

**आठवडे बाजारात येणाऱ्या ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना इतरही अनेक समस्या तोंड वर काढत आहेत. यात बाजारात फिरणारे पाकिटमार, मोबाइल चोर, महिलांची छेड काढणारे गुंड यांचा बंदोबस्त करणे हेही तितकेच गरजेचे आहे. बाजारातील वातावरण निर्भय निर्मळ असावे अशी अपेक्षा ग्राहकांकडून होत आहे. यामुळे पोलीस प्रशासनाने भुरट्या चोरांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.**

# उमरी येथे बारावी बोर्ड परीक्षा सुरळीत संस्थापकांची परीक्षा केंद्रास भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**



बारावी बोर्डाच्या परीक्षा अत्यंत शांतमय,सुरळीत कॉपीमुक्त वातावरणात सुरू झाल्या असून उमरी शहरातील ०२ परीक्षा केंद्रावर विद्यार्थी परीक्षा देत असल्याची माहिती नुतन विद्यालय, यशवंत विद्यालय ज्यु.कॉलेज दोन्ही प्राध्यापकांनी यांनी दिली.

या परीक्षा शहरातील नुतन विद्यालय येथे ३९८ विद्यार्थी,तर यशवंत हायस्कूल ज्युनिअर कॉलेज येथे ४६३ विद्यार्थी ह्या दोन्ही केंद्राचे विद्यार्थी असे एकूण ८६१ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.या परीक्षा भयमुक्त कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी तत्पर तद्वत परीक्षा केंद्रावर काही समस्या उद्भवल्यास परिरक्षक कार्यालयाशी संबंधितांनी संपर्क साधावा असे आवाहन गटशिक्षणाधिकारी कुलकर्णी यांनी केले आहे..सदर,बारावी इंग्रजी पेपर उपस्थित नुतन विद्यालय येथे ३९८ विद्यार्थी,तर यशवंत हायस्कूल ज्युनिअर कॉलेज येथे ४६३ विद्यार्थी ह्या दोन्ही केंद्राचे विद्यार्थी असे एकूण ८६१ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

शिक्षण संचालक तहसीलदार शिक्षण अधिकारी यांनी परीक्षा केंद्रास भेट दिले आहेत.यावेळी परीक्षा सुरळीत शांततेत चालल्याचे पाहून समाधान व्यक्त केले. आवश्यक त्या सूचना केल्या आहे.लातुर बोर्डा, जिल्हाधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांच्या सूचनेनुसार शात वातावरणात नूतन विद्यालयाच्या वतीने परिक्षा विद्यार्थीचा पुष्पहार घालून स्वागत करून आनंदात परिक्षा देण्यास आत प्रवेश दिला आहे.यात पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी,नुतन विद्यालय प्राचार्य ,यशवंत विद्यालय ज्यु.कॉलेज प्राचार्य शिक्षक वृंद सेवकवर्ग,पोलीस प्रशासन,होमगार्ड याच्या उपस्थितीत सुरळीत कॉपीमुक्त वातावरणात पार पडत आहे.

# 'लाडक्या बहिणीं'चे पैसे कसे बंद करतात तेच पाहतो:जयंत पाटलांचा महायुती सरकारला इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची छाननी सुरू केली असून निकषात न बसणाऱ्या महिलांना अपात्र ठरवले जाणार आहे. आतापर्यंत पाच लाख लाभार्थींना अपात्र ठरवत त्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे देखील आक्रमक झाले आहेत. त्यांनी सरकारला इशारा देत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद होणार, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका-तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही सांगितले.



महायुती सरकारने गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची अर्थसाहाय्य केले जात आहे. त्याचा महायुतीला निवडणुकीत मोठा फायदा झाला. पण आता सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. त्यात अनेक महिलांनी खोटी माहिती देऊन या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर येत आहे. विशेषतः इतर सरकारी योजनांतील लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकार या प्रकरणी काटेकोट पडताळणीवर भर देत आहे. आतापर्यंत या योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थींना वगळण्यात आले आहे.आता आम्ही लाडक्या बहिणीची बाजू घेऊन काम करणार आहोत, असे जयंत पाटील म्हणाले. लाडक्या बहिणीचे पैसे बंद होणार नाहीत, यासाठी आमचा लढा राहणार असल्याचेही ते म्हणाले. लाडक्या बहिणींनो आम्ही तुमच्या मागे आहोत, असा विश्वासही त्यांनी दिला.लाडक्या बहिणींनी तुम्हाला मते दिली आहेत, त्यांना तुम्ही शब्द दिला आहे, त्यामुळे एकदा दिले तर दिले, त्यांनी मते दिली आहेत, त्यामुळे बघून द्यायचे होते, आम्ही घाई करा म्हणत होतो का? असा खोचक टोला जयंत पाटील यांनी महायुती सरकारला लगावला आहे. लाडकी बहिणींसाठी पैसे बंद होणार नाही, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका-तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

वाघोली परिसरातील अस्वच्छता, दुर्गंधी, कचऱ्याचे अव्यवस्थापन आणि त्यामुळे पसरणारे साथीचे विविध आजार यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. पुणे महानगरपालिकेवर सध्या प्रशासन बसलेले असल्याने आणि लोकप्रतिनिधी नसल्याने वाघोलीकरांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले.या सर्व अडचणी लक्षात घेऊन, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदिप सातव आणि रत्नदीप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांनी क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली ही मोहीम हाती घेतली आहे.




मोहिमअंतर्गत अंतर्गत, वाघोलीतील विविध परिसरात हे अभियान राबवले जात आहे. या अभियानात परिसराची स्वच्छता करणे, कचरा गोळा करणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे, तसेच स्वच्छ व निरोगी वातावरणाबद्दल जनजागृती करणे असे उपक्रम राबविले आहेत.रत्नदीप सोशल फाउंडेशन आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वाघोलीतील विविध सोसायटी परिसरात क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. या अभियानाबद्दल वाघोलीतील नागरिकांमध्ये एवढे कुतूहल निर्माण झाले की, जवळपास ३००- ३५० नागरिक उत्स्फूर्तपणे या अभियानात सहभागी झाले होते.या वेळी नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सर्व अधिकारी कर्मचारी व ड्रायव्हर, सेवक तसेच शाळेचे शिक्षक, पदाधिकारी आदी मान्यवरांचे क्लीन वाघोली ग्रीन वाघोली या मोहिमेला विशेष सहकार्य लाभले.

> **प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या स्वच्छ भारत अभियानाच्या संकल्पनेतून वाघोलीत 'क्लीन वाघोली, ग्रीन वाघोली' या उपक्रमाची सुरुवात आम्ही केली आहे. यामध्ये नागरिकांनी मोठया प्रमाणावर सक्रिय होऊन स्वच्छतेसाठी विविध उपक्रम राबवले.या उपक्रमामुळे वाघोली परिसर अधिक स्वच्छ आणि सुंदर बनत आहे व सामाजिक क्षेत्रात आदर्श उपक्रम मानल्या जात आहे.**
> **- संदिप सातव (पुणे जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा)**



**श्री. संत गुरु रविदास महाराज जयंती निमित्य पेठवडज येथे श्री.बालाजी फिल्डवेअर सोसायटीच्या वतीने श्री अशोकराव शामराव डावकोरे साहेब यांनी मंदिराची रंगरंगोटी करुन दिली तसेच जयंतीनिमित्त उपस्थीत राहून समस्त चर्मकार समाज बांधवांना जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

# आदीनाथ पडोळे यांनी आई-वडिल व मा.आ.साहेबराव दरेकर नाना यांच्या चरणी केला पुरस्कार अर्पण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



अहिल्यानगर येथे शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आष्टीचे माजी आमदार आणि ज्येष्ठ नेते साहेबराव दरेकर नाना यांना शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.हा पुरस्कार त्यांच्या साहित्य, समाजकार्य,आणि राजकीय योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यासाठी दिला जातो.साहेबराव दरेकर नाना यांनी दीर्घकाळ आपल्या समाजातील आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाने अमूल्य योगदान दिले आहे,त्यामुळे हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी दिला गेला आहे.तसेच आदिनाथ विठ्ठल पडोळे सर यांना राज्यस्तरीय शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार २०२५ मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन! महाराष्ट्र राज्य आणि सांस्कृतिक साहित्य मंडळ,मुंबई तसेच शब्दगंध साहित्य परिषद,महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा सन्मान प्राप्त झाला आहे,हे अत्यंत गौरवाची बाब आहे.त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी हा पुरस्कार दिला गेला, यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा!

गुरु-शिष्य संबंधांवर आधारित एक सन्मानाचा प्रसंग व्यक्त करण्यात आला आहे,ज्यामध्ये पडोळे सरांनी मिळालेला पुरस्कार त्यांच्या आई-वडिलांना आणि माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांच्या चरणी अर्पण केला आहे.हा प्रसंग गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व आणि आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आहे.

याप्रकारचे कार्यक्रम समाजात प्रेरणा देणारे असतात आणि आपल्या गुरु, शिष्य,वडीलधारी मंडळी यांच्या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित करतात.

# नविन तंत्रज्ञानाचा वापर करून साखर,इथेनॉल,बायोगॅस,विज निर्मिती करणारा साखर कारखाना उभारणार-मारोतराव कवळे गुरूजी

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव पा.गायकवाड

व्हि पी के उद्योग समूहातील एम व्ही के ग्रो साखर कारखाना वाघलवाडा चे विस्तारीकरण करून ५००० मे टन प्रती दिवस गाळप क्षमतेचा नवीन साखर कारखाना व बाय प्रॉडक्ट निर्मिती करणार व्हि पी के उद्योग समूहातील एम व्ही के ग्रो साखर कारखाना वाघलवाडा हा कै डॉ शंकररावजी चव्हाण साहेबांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून कै आ लक्ष्मणरावजी हस्सेकर साहेब यांच्या अथक परीश्रमाने उभारण्यात आला.त्या कारखान्यास आता चाळीस वर्ष पूर्ण होत आले आहेत आणि तेव्हा वापरण्यात आलेली मशनेरी त्याकाळात योग्य होती परंतु आता तो कारखाना चालवत असताना वारंवार अडचणी येत आहेत आणि जो साखर उतारा मिळायला हवा तो मिळत नाही.बग्यास मध्ये रस अधिकचा जाऊन नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे आणि त्यात वापरण्यात आलेले बॉयलर कमी क्षमतेचे असून ते अधिकचा बग्यास खातात त्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे आणि मनुष्यबळ अधिक लागत असल्याने उत्पादन खर्चात वाढ होत आहे आणि माघच्या चाळीस वर्षात मशनरी मध्ये मोठा बदल होऊन आता अत्याधुनिक टेक्नॉलॉजी बाजारात आली आहे त्यामूळे आधुनिक टेक्नॉलॉजीचा नवीन कारखाना उभारून त्यात साखरे सह वीजनिर्मिती, इथेनॉल,बायोगॅस या सारखे बाय प्रॉडक्ट तयार केले तरच आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे शक्य होणार आहे याचा विचार करून व्हि पी के उद्योग समूहाचे चेअरमन मा श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी देशभरात फिरून आनेक कारखान्यांना भेटी देऊन त्याचा अभ्यास करून नवीन कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यासाठी सुमारे ४०० कोटी रुपये खर्च लागणार आहे त्या अनुषंगाने आर्थिक नियोजन करत असताना १०% रक्कम शेतकऱ्याकडून जमा करावी लागणार आहे आणि ३०% रक्कम स्वतः कारखानदार गुंतवणूक करणार आणि उर्वरित ६०% रक्कम बँकेकडून कर्ज घेऊन वित्त पुरवठा करून पुढील गाळप हंगामात नवीन कारखाना गाळपास सज्ज करायचा आहे.शेतकऱ्यांकडून जी १०% रक्कम गोळा करायची आहे त्या साठी एकूण सोळा हजार सभासद करायचे आहेत आणि सभासद



ठेव रक्कम २५०००/- रु प्रती हेक्टर ठेवण्यात आली आहे.जे ऊस उत्पादक हेक्टरी २५०००/- रु भरून सभासद होतील केवळ त्यांचाच हेक्टरी १५० मे टन ऊस गाळपासाठी नवीन कारखान्यात जाणार आहे आणि त्या सभासदास पहिल्या वर्षी प्रती टन २००/- रु भाववाढ मिळणार आहे आणि तिथून पुढे प्रती वर्षी १००/- प्रमाणे भाववाढ मिळेल.शेतकऱ्यांनी लक्षात घ्यावे आपण २५०००/- रु भरून सभासद झाल्यानंतर आपला १५० टन ऊस गाळपासाठी जाऊन भाव वाढी मुळे आपणास पहिल्याच वर्षी ३००००/- रु नफा मिळणार आहे व दुसऱ्या वर्षी ४५०००/- तिसऱ्या वर्षी ६००००/- चवत्या वर्षी ७५०००/- असा एकूण २१००००/- रुपयांचा नफा सभासद होणाऱ्या शेतकऱ्यास मिळणार आहे त्या मुळे आपण सभासद होण्यासाठी भरलेल्या रकमेसह पाच हजार रु अधिकचे पहिल्याच वर्षी मिळतील आणि आपण कायम स्वरुपी कारखान्याचे सभासद राहाल पहिल्या वर्षी साखर उत्पादन आणि वीज निर्मिती सुरू होणार आहे त्यामुळे पहिल्या वर्षी दोनशे रुपये भाव वाढ आहे आणि त्या नंतर प्रत्येक वर्षी बाय प्रॉडक्ट चे नवीन युनिट तयार होतील आणि कारखाण्यावरील कर्जाचे ओझे हळू हळू कमी होणार असल्याने प्रती वर्षी शंभर रुपये भाव वाढ मिळेल त्यामूळे रेगुलर दरापेक्षा पाचशे रुपये भाव वाढ होणार आहे. ज्या लोकांकडे अधिकचा पैसा आहे अश्या व्यक्तींनी कारखान्याकडे गुंतवणूक(फिक्स डीपोजीट)केल्यास त्यांना द.सा.द.शे १५% व्याज मिळणार आहे.

आपल्या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करून शेतकऱ्यांमध्ये आर्थिक क्रांती घडवण्याच्या दृष्टिकोनातून या युनिटची उभारणी करण्याचा मानस उद्योग समूहाचा आहे तरी कार्यक्षेत्रातील उमरी,धर्माबाद,नायगांव,भोकर आणि बिलोली या तालुक्यातील शेतकऱ्यांना सभासद होण्याची संधी प्रथम असणार आहे आणि एकूण केवळ सोळा हजार सभासद करून घेण्याचे नियोजन आहे त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी विलंब करू नये कारण सोळा हजार सभासद नोंदणी पूर्ण झाल्या नंतर आपण प्रयत्न करून सुद्धा आपणास सभासद करून घेता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. कार्यक्षेत्रातील सभासद नोंदीचा कालावधी पूर्ण झाल्या नंतर कर्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यास सभासद नोंदीची अनुमती दिली जाणार आहे त्यामुळे आपल्या भागातील शेतकऱ्याने आपली सभासद होण्याची रक्कम आपल्या जवळच्या व्हि पी के पथसंस्थेच्या शाखेत भरणा करून आपली सभासद नोंदणी करावी असे आवाहन व्हिपीके उद्योग समूहाचे चेअरमन मा.श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी केले आहे.

## संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित

लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत

संत सेवालाल महाराज जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून संत सेवालाल महाराजांची जयंती विविध समाज उपयोगी उपक्रम घेऊन साजरी करणार असल्याचे पृथ्वीराज पंडित यांनी यावेळी सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या बैठकीला युवानेते पृथ्वीराज पंडित, भवानी बँकेचे संचालक दीपक आतकरे, विनोद सौंदरमल, उत्तमराव सोलाने, रामेश्वर पवार, अनिल राठोड, अजिम इमानदार, सतीश दाभाडे यांच्यासह बंजारा समाजबांधव उपस्थित होते. यावेळी संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारणीची निवड करण्यात आली.कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित, उपाध्यक्षपदी रवी पवार, सरपंच शीतल साखरे, कमलेश वाघमारे, शेखर हुंबे यांची तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ गिरगे, सचिवपदी शेख रहीम, सहसचिव पदी अमित सौंदरमल, कोषाध्यक्षपदी अमोल राठोड, संघटपदी सतिश प्रधान तसेच सल्लागार समितीमते समाजाती सर्व कर्मचारी, राजकीय व सामाजिक पक्ष संघटनाचे पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.कार्यकारिणीच्या बैठकीचे संचलन सुनील चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनिल राठोड यांनी मानले. यावेळी बंजारा समाजातील कार्यकर्ते तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## हिंगोली येथील शासकीय विश्रामगृह येथे डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची बैठक संपन्न





लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

हिंगोली येथील शासकीय विश्राम ग्रहांमध्ये दि ११ फेब्रुवारी रोजी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची बैठक पार पडली असून या बैठकीला डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत महाराष्ट्र राज्य समन्वय इकबाल शेख, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य संघटक तेजस राऊत, छ संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष रमेश नेटके, यांच्या उपस्थितीमध्ये हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहामध्ये पत्रकाराची निवड करण्यात आली असून या निवडीमध्ये हिंगोली सह सेनगाव, कळमनुरी ,औंढा नागनाथ, येथील तालुका अध्यक्षाची नेमणूक करण्यात आली आहे तर सेनगाव तालुका अध्यक्षपदी पत्रकार महादेव हरण, तालुका उपाध्यक्षपदी मोहन कांबळे, तालुका सचिव पदी रमाकांत पोले, तालुका कार्याध्यक्ष सिकंदर पठाण यांची निवड करण्यात आली.

## जि.प.प्रा.शाळा श्रीगोंदा मुलींच्या शाळेत ऐतिहासिक नाण्यांच्या प्रदर्शनास प्रतिसाद

लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

श्रीगोंदा शहरातील जि.परिषद प्राथमिक शाळा मुली या ठिकाणी ८ फेब्रुवारी २०२५ रोजी भरविण्यात आलेल्या जुन्या नाण्यांच्या प्रदर्शनास प्रचंड विद्यार्थी व पालक यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

जि.परिषद प्राथमिक शाळा श्रीगोंदा मुली या शाळेत नेहमीच उपक्रमशील उपक्रमांची रेलचेल असते. शनिवार ८ फेब्रुवारी २०२५ रोजी एक नवीन उपक्रम या शाळेत घेत विद्यार्थ्यांमध्ये संग्रह प्रवृत्ती वाढावी. त्यांनी कोणता ना कोणता छंद जोपासावा. तसेच त्यांना ऐतिहासिक नाणी आणि नोटांची माहिती मिळावी, यासाठी शाळेत ऐतिहासिक नाण्यांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले

होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी विद्यार्थिनी सौ. पल्लवी अतुल जंजीरे/



ढगे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमासाठी संग्रहकार गणेश डेंबळकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी मुलांना ऐतिहासिक नाणी आणि नोटांची माहिती दिली. त्याचप्रमाणे परदेशी चलन दाखवून त्याचेही महत्व सांगितले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, शिक्षक आणि मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संग्रहकार गणेश डेंबळकर यांनी मुलांना मार्गदर्शन करत नाणी नोटा, वेगवेगळ्या प्रकारची मृदा, समुद्रातील शंख शिंपले या सर्वांची माहिती दिली. याशिवाय वेगवेगळ्या देशांचे परदेशी चलन दाखवत त्यांची माहिती बालचमुंना देण्यात आली. या नाणी आणि नोटा पाहून विद्यार्थी हरवून गेले. त्या नाणी आणि नोटा स्वतः विद्यार्थ्यांनी हाताळल्या. त्या नोटांची माहिती घेतली. शंका येईल तेथे प्रश्न विचारले. यावेळी बोलताना मुख्याध्यापिका श्रीमती.वसुधरा जगताप म्हणाल्या श्री.जी.डी डेबळकर यांच्या विविध प्रकारच्या संग्रहांचे प्रदर्शन पूर्वनियोजितपणे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात श्री.जी.डी. डेबळकर यांनी दगड, माती, जुनी नाणी, शिवकालीन नाणी, शंख-शिंपले, बोधकथा, सुविचार, कात्रणे इ. विविध बाबींचा संग्रह कल्पकतेने व शोधक वृत्तीने मांडण्यात आला.श्री.जी.डी. डैबळकर यांचा संग्रह विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचेसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचा उपक्रम स्तुत्य व मार्गदर्शक असुन हा उपक्रम सर्वांना आवडला असल्याचे सांगून श्री .जी.डी डेबळकर सर यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यायावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वसुंधरा जगताप व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री रामदास ननवरे परिवहन समितीचे अध्यक्ष अरविंद चव्हाण तज्ञ मार्गदर्शक दत्ताची जगताप सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी पालक उपस्थित होते

## शहरातील माऊली नगर येथे हभप देगलूरकर महाराजांची त्रिदिवसीय प्रवचनमालाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

शहरातील माऊली नगर येथे नाम धारकाचा ठसा या विषयावर दि.(१४) फेब्रुवारी ते दि.(१६) फेब्रुवारी दरम्यान त्रिदिवसीय प्रवचनमाला चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक गोविंद सावकार कवठेकर व गोपाळ सावकार कवठेकर यांच्या कडून देण्यात आली.

हभप गुरूवर्य लक्ष्मीकांत महाराज लोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा शहरातील माऊली नगर येथील विठाई सदन येथे दि.१४ फेब्रुवारी ते दि.१६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ह.भ.प. सद्गुरू श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या मधूर व रसाळ वाणीतून नामधारकाचा वसा या विषयावर तीन दिवशीय प्रवचनाचे दररोज दुपारी २ ते ४ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.सदरील प्रवचनास प्रमुख उपस्थिती प.पू.गुरूवर्य शरद महाराज बनवसकर,प.पू.भागताचार्य अनंत महाराज बेलगावक,प.पू.भागवताचार्य वामन महाराज पालमकर, श्री हभप महेश महाराज वाढवणकर,श्री हभप केशव महाराज पालमकर,श्री हभप एकनाथ महाराज हरसदकर श्री हभप भालेराव गुरूजी महागावकर, श्री हभप आत्माराम महाराज रायवाडीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तसेच दि.(१६) फेब्रुवारी रोजी रविवारी सकाळी ठिक ९ ते १० या वेळेतील प्रवचनानंतर १० ते १२ या वेळेत हभप हभप सद्गुरू श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक गोविंद मारोती कवठेकर व गोपाळ मारोती कवठेकर यांच्या कडून व समस्त कवठेकर परिवारांकडून देण्यात आली.

## गेवराईची शांभवी आकाशवाणीवर

लोकनेता न्यूज नेटवर्क । गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत

आकाशवाणी बीड केंद्रावरील अक्षरलेणी या साहित्य विषयक



कार्यक्रमात येथील न.प.कर्मचारी रत्नाकर बोर्डे यांची कन्या कु.शांभवी हिचे काव्यवाचन प्रसारित होणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी बीड केंद्रावरून दि. १५ फेब्रूवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रसारित केला जाणार आहे. तरी रसिक श्रोत्यांनी आवर्जून कु.शांभवीचे कविता वाचनाचा लाभ घ्यावा ,असे आवाहन कवी प्रकाश भुत्ते, ड सुभाष निकम, विष्णू खेत्रे ,प्रा. राजेंद्र बरकसे, प्रशांत रुईकर, शरद सदाफुले, वसंत केदार , सुरेखा रामदासी व गेवराई साहित्य रसिकांनी केले आहे.

## मरखेल पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी रवींद्र हुंडेकर यांचा हातभट्टी गावठी दारू आड्ड्यावर छापा

लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । जयपाल दावनगीरकर

देगलूर तालुक्यातील मरखेल पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या मौजे लोणी तांडा येथील गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्यावर हातभट्टी आड्डयावर मरखेल पोलिस सहायक निरीक्षक रविंद्र हुंडेकर यांनी छापा टाकून वीस हजार रुपये किमतीचे गावठी हातभट्टीची दारू सहित साहित्य नष्ट करण्याची धडक मोहीम पोलिसांनी हाती घेऊन कारवाई करण्यात आली आहे.

या अवैध देशी, विदेशी दारू विक्रेत्यांवर धाडी टाकल्या त्यानंतर पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारू आड्डयावर धाड टाकून धडक मोहीम राबवली त्या धडक मोहीमेत कारवाई केल्याने अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. पोलिस ठाणे मरखेल अंतर्गत लोणी तांडा येथे मागिल अनेक महिण्यांपासून रसायन, गुळाची व मोह फुल मिश्रित गावठी दारू ची अवैध रित्या विक्री होत असल्याने अनेक व्यसनी गेलेल्या लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे याची माहिती पोलिसांना



मिळताच सहायक पोलीस अधिकारी रविंद्र हुंडेकर,जमादार अब्दुल बारी,दत्ता पाटील,पोलिस अंमलदार सचिन गिरे,रविंद्र घुले,राजीव लोखंडे, माजिद पठाण यांच्या सह इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी लोणी तांडा येथील गावठी हातभट्टी दारू आड्डयावर छापा टाकून रामराव काशिराम पवार, पंढरी किशन जाधव रा. लोणी तांडा यांच्या घरासमोरील अंगणात पत्र्याच्या शेडमध्ये एकूण ४४० लिटर

### वीस हजार किमतीचे दारूसह साहित्य नष्ट

गावठी हातभट्टी रसायन मिश्रित दारू किंमत २० हजार ४०० रूपयांचे अवैध रित्या दारू साठा विक्री करण्याच्या उद्देशाने आढळून आले व दारू बनवणाऱ्या साहित्याची नष्ट करण्यात आला यावेळी पोलीस कॉ.राजीव लोखंडे व सचिन गिरे पोलिस स्टेशन मरखेल यांच्या फिर्यादीवरून उपरोक्त दोघांविरुद्ध मरखेल स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आले पुढील तपास पो. नि.रविंद्र हुंडेकर करत आहेत...

## कुशावाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

# जयंती निमित्त भव्य किर्तन व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन-जयंती महोत्सव समिती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील मौजे कुशावाडी येथे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य कीर्तन आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या निमित्ताने देगलूर तालुक्यातील सर्व शिवभक्त व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक समितीच्या वतीने करण्यात आले.देगलूर तालुक्यातील मौजे कुशावाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १२ ते १९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. शिबिरात तपासणी केलेल्या रुग्णांना दि. १८ फेब्रुवारी मंगळवार या दिवशी मोफत आरोग्य तपासणी आणि औषधी वाटप करण्यात येणार आहे यात हृदयविकार, मूत्रपिंड विकार मुतखडा, पोटाच्या आजार, हाडाचे आजार, पाठीच्या मणक्याचे आजार, लिव्हर संबंधित आजार, कान, नाक, घसा, मेंदू विकार, डोळ्यांचे आजार इत्यादी आजाराची तपासणी सुप्रसिद्ध तज्ज्ञांकडून करण्यात येणार आहे. या शिबिरात अपेक्षा हॉस्पिटल नांदेड, संजीवनी हॉस्पिटल नांदेड, अशा हॉस्पिटल नांदेड, भगवती हॉस्पिटल नांदेड, नेत्र रुग्ण सेवा मंडळ देगलूर अशा ठिकाणच्या दवाखान्यातील सुप्रसिद्ध तज्ञ तपासणी करणार आहेत तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांना सदरील तपासणी व औषधी मोफत देणार असल्याचे जयंती महोत्सव समितीकडून सांगण्यात आले आहे.

या भव्य कीर्तन सोहळ्यात दिनांक १२ फेब्रुवारी बुधवार या दिवसापासून सुरूवात करण्यात आले असून या भव्य किर्तनासाठी ह.भ.प. ब्रम्हानंद महाराज जाहूरकर, दिनांक १३ फेब्रुवारी गुरूवार या दिवशी ह.भ.प. कान्होपात्राताई कुंडलवाडीकर, दिनांक १४ फेब्रुवारी शुक्रवार या दिवशी ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर, दिनांक १५ फेब्रुवारी शनिवार या दिवशी ह.भ.प. साक्षीताई शिंदे आळंदीकर, दिनांक १६ फेब्रुवारी रविवार या दिवशी ह.भ.प. रोहिदास महाराज कळकेकर, दिनांक १७ फेब्रुवारी सोमवार या दिवशी ह.भ.प. शंभर जयाताई मोरे उदगीरकर, दिनांक १८ फेब्रुवारी मंगळवार या दिवशी ह.भ.प. संतोष महाराज कुशावाडीकर, दिनांक १९ फेब्रुवारी बुधवार या दिवशी ह.भ.प. शिवमुर्ती महाराज लाडे यांच्या शेवटी काल्याच्या किर्तनाने भव्य किर्तन सोहळा संपन्न होणार आहे. या किर्तनास गायनाचार्य ह.भ.प. श्रीकांत महाराज पंढरपूरे काठेवाडीकर व निळकंठ नाईक बेन्नाळकर, मृदंगाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली नारायणखेडकर यांचा साथ लागणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी दादाराव पाटील हिंगोली, सरपंच सौ तारकेश्वरी तानाजीराव इंगोले, सुरेश हणमंतराव हिंगोले, बालाजी राजाराम हिंगोली, नारायण बळीराम हिंगोले, माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती देगलूरचे रणजीत भाऊराव हिंगोले, माजी सरपंच जयसिंग तुकाराम कोसंबे, संदीप तानाजी चव्हाण, जयश लक्ष्मणराव पाटील, तंटामुक्ती समिती अध्यक्ष माधव मारोती हिंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती महोत्सव साजरा होणार आहे. या जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी केशवराव डुकरे, उपाध्यक्ष नंदकिशोर अशोकराव हिंगोले, कार्याध्यक्ष मारोती निवृत्तीराव कोसंबे, कोषाध्यक्ष हणमंत तेजेराव कोसंबे, सचिव मनोज वामनराव हिंगोले, हणमंत समर्थराव हिंगोले शिवजन्मोत्सव समितीतील सन्माननीय सदस्य व समस्त गावकरी नागरिक यांच्याकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## माहूर येथे गुरू रविदास समता परिषदे तर्फे संत रविदास महाराज जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**



संत रविदास महाराज यांच्या ६४८ व्या जयंती निमित्य माहूर येथे आ.भा.गुरु रविदास समता परिषद शाखा माहूर च्या वतिने संघटनेच्या संपर्क कार्यालयात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रथम विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत रविदास महाराज यांच्या प्रतीमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मंडळीनी अभिवादन केले. यावेळी संत रविदास महाराज यांच्या जीवनचरित्रावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. यावेळी उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, माहूर पं.स.चे माजी सभापती वसंतराव कपाटे, शिवसेना शहर प्रमुख निलधारी जाधव,अ.भा.गुरु रविदास समता परिषदेचे(ग्रामीण) जिल्हा उपाध्यक्ष संजय बनसोडे, माजी नगरसेवक इलियास बावानी, पत्रकार राज ठाकूर, अमृतराव जगताप, नंदकुमार जोशी,अ.भा. गुरु रविदास समता परिषदेचे तालुकाध्यक्ष अँड.नितेश बनसोडे, मारोती कांबळे, चंद्रकांत देवरसे, प्रवीण कांबळे, नां. जि.म. सहकारी बँकेचे सेक्रेटरी वांगे आदीची उपस्थिती होती. : माहूर शहरात अ.भा.गुरु रविदास समता परिषदच्या संपर्क कार्यालयात गुरु रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवर आदी.

## कौलारूंची घरे झाले हद्दपार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । माधव नागलवाड**



सिमेंट कॉँक्रेटच्या उंच-उंच इमारती शहरात पहावयास मिळत असल्या तरी त्याचाच परिणाम आता ग्रामीण भागातही दिसून येत आहे. कुडा मातीच्या भिंतीची जागा आता सिमेंट कॉँक्रेटने घेतली आहे. त्यामुळे कौलारु, कुडा मातीची घरे आता ग्रामीण भागातही मावळताना दिसून येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना,रमाई आवास योजना अशा प्रकारच्या घरकुल योजना शासनामार्फत गरजुंना दिल्या जातात. यासाठी शासनाकडून भरीव निधी ही उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेसाठी सिमेंट कॉँक्रीट बांधकामाला मोठी मागणी असते. सिमेंट कॉँक्रीट बांधकाम झाले तरच लाभार्थींना हफ्ते पाडून त्या घरकुलाची रक्कम दिली जाते.पूर्वीचे असणारे कुडा मातीचे घर मोडकळीस आल्याने त्या जागी सिमेंट कॉँक्रीटच्या पक्या बांधकामाने घेतली आहे. त्यातच डौलदार कौलारुची घरे व चिरबंदी वाडे मात्र खेड्यातून हद्दपार होताना दिसून येत आहेत.

नोकरीनिमित्त बाहेरगावी वास्तव्यास असलेला नोकर वर्ग दसरा, दिवाळी यासारख्या सणाला आपल्या गावी येवून आपल्या मुलाबाळांसह आजी आजोबासह सण-समारंभ साजरे करायचे अशातच कौलारु घरासमोर अंगणात सडा सारवण करुन रांगोळी टाकली की सकाळी मन प्रसन्न व्हायचे.

मात्र बदलत चाललेल्या आधुनिक युगात मानवाची जीवन शैलीही तितक्याच प्रमाणात बदलली. खेड्यापाड्यांसह शहरातही पूर्वी कौलारुची कुडामातीची घरे बघायला मिळायची. परंतु आज कौलारु घराची जागा सिमेंट कॉँक्रिटच्या घराने घेतल्याने पुरातन काळापासून असलेली कौलारु घरे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. खेड्यामध्ये सध्या कौलारुचे केवळ काही अवशेषच शिल्लक आहेत.त्यामुळे कौलारू तयार करणाऱ्या लोकांचा व्यवसाय बुडीत निघाला असं म्हणायला काही हरकत नाही.

## शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी एक पाऊल पुढे!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**



शेतकरी बांधवांनो, आपल्या शेतीच्या विकासासाठी आणि सरकारी योजनांचा सहज लाभ घेण्यासाठी शासनाने 'अॅग्रीस्टॅक' म्हणजेच शेतकरी ओळखपत्र क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या क्रमांकामुळे आपल्या जमिनीची माहिती आधार क्रमांकाशी जोडली जाईल आणि शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ सहज मिळणार आहे.

**शेतकरी ओळखपत्र क्रमांकाचे फायदे**

शासनाच्या कृषीविषयक योजना अधिक पारदर्शक आणि जलद कार्यान्वित करण्यासाठी हे ओळखपत्र उपयुक्त ठरेल. त्याचे काही महत्त्वाचे फायदे खालीलप्रमाणे आहेत :

**थेट सरकारी अनुदान व मदत**

पीएम किसान सन्मान निधी – दरवर्षी थेट बँक खात्यात जमा होण्यास मदत होईल. तसेच पीक विमा आणि कर्ज मंजुरी – तातडीने प्रक्रिया, कृषी अनुदान, खत व बियाणे योजनेचा जलद लाभ

**आधुनिक शेतीसाठी मदत**

हवामान अंदाज, आधुनिक शेती सल्ला आणि बाजारभाव माहिती,मृदा परीक्षण व खत सल्ला

**राज्य आणि केंद्र सरकारच्या सर्व कृषी योजनांमध्ये प्राधान्य**

नवीन कृषी तंत्रज्ञान, अवजारे आणि सिंचन योजना, शेततळे, ठिबक सिंचन, गटशेती योजनेतील लाभ,गटगटवारी नोंदणी व शेतकऱ्यांसाठी विशेष सवलतीसाठी हे महत्वाचे ठरणार आहे.

**शेतकरी ओळखपत्र नोंदणी प्रक्रिया**

आपल्या गावात किंवा तालुक्यातील अधिकृत केंद्रावर जाऊन आपण सहज नोंदणी करू शकता.

**नोंदणी केंद्र**

ग्रामपंचायत कार्यालय
CSC सेंटर (कॉमन सर्व्हिस सेंटर)
आपले सरकार सेवा केंद्र
तलाठी कार्यालय

**नोंदणीसाठी कोणते कागदपत्रे आवश्यक?**

आधार कार्ड,आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक
७/१२ उतारा (जमिनीचा दाखला)
नोंदणी मोफत असून, तातडीने नोंदणी करा!

शेतकरी बंधूंनो, ही नोंदणी पूर्णतः मोफत आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांना बळी न पडता, आपल्या हक्काचे शेतकरी ओळखपत्र तात्काळ मिळवा. सरकारच्या विविध योजनांचा लाभ घ्या आणि आपल्या शेतीच्या उत्पादनात वाढ करा!



**कौठा येथे श्री संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी सरपंच प्रतिनिधी शिवकुमार देशमुख ,आझाद ग्रुपचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पांडे, चेअरमन प्रताप देशमुख, रामदास कापसे, पप्पू देशमुख ,भुजंग देशमुख ,रोहीदास शिराढोणे ,इस्माईल शेख ,दिगंबरराव हराळे ,मारोती हराळे ,लालबा वाघमारे ,यादव हराळे, संतोष हराळे सह गावकरी मंडळी उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

## उस्माननगर येथे संत श्री गुरू रविदास महाराज जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**



उस्माननगर येथील बसस्थानक परीसरातील शिवसेना ध्वज प्रांगणात संत रविदास यांची जयंती बुधवारी दि. १२ रोजी सकाळी ११ वाजता गावातील प्रतिष्ठीत लोकप्रतिनिधी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, पत्रकारांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भाजपचे राष्ट्रीय परिषदेचे सदस्य तु. शं. वारकड यांच्या उपस्थितीत संत श्री गुरू रविदास महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहाराने अभिवादन करण्यात आले. सामुदायिक आरती स्तवन करून यावेळी संयोजकांनी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजीव सोनटक्के यांनी करतांना संत श्री गुरू रविदास महाराजांच्या समतेच्या विचाराची आजच्या काळात सुद्धा मोठी गरज असल्याचे सांगितले. यावेळी ग्रामसेवक डी. ए. शिंदे, पप्पू पाटील, संजय वारकड, अशोक काळम, बालाजी पाटील घोरबांड, राहुल दे. सोनसळे, गंगाधर भिसे, गुरुनाथ माने, अमीनशहा फकीर, कमलाकर शिंदे, , बालाजी डांगे, गजानन देवणे, पुंडाजी बास्टे, गोविंद भिसे, जावेद सय्यद, पांडुरंग होळगे, ज्ञानेश्वर पोटजळे, पोलीस पाटील विश्वंभर मोरे, नागोराव वारकड, गंगाधर इसादकर, अमिन आदमनकर, गफ्फार शेख,गणेश लोखंडे, लक्ष्मण कांबळे, प्रदीप देशमुख, प्रमोद कांबळे, दिपक लोखंडे, डॉ. प्रशांत घोरबांड, मारोती घोरबांड, सद्दाम पिंजारी, राम भिसे, संभाजी काळम, शौकत अली, शिवशंकर काळे रामदास घोरबांड, आदींची उपस्थिती होती. जयंती सोहळ्यात यावेळी रामदास सोनटक्के, सुखदेव सोनटक्के, संभाजी अन्नपूर्णे, भगवान सोनटक्के, लक्ष्मण सोनटक्के, नारायण हराळे, व्यंकटी सोनटक्के, गोविंद सोनटक्के, कृष्णा सोनटक्के, राजू सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले. यावेळी शिवसांब कोरे, प्रा. विजय भिसे यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास सोनटक्के यांनी करून आभार मानले. प्रसाद वाटपानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904